मा. संपादक,

दै. ---------------------------------------------------------------------

यांसी सस्नेह नमस्कार,
कृपया खालील वृत्तास आपल्या लोकप्रिय दैनिकातून ठळकपणे प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.
आजपर्यंत नेहमीच आपण आम्हास भरीव सहकार्य दिलेले आहे.
तसेच ते यावेळी मिळावे, ही विनम्र अपेक्षा,

(विशेष विनंती : सोबत कार्यक्रमाची निमंत्रण पाठवित आहोत.
आपण आपल्या प्रतिनिधीसह कृपया उपस्थित रहावे.)

कळावे,

आपला स्नेहांकित

पांडुरंग तावरे
(संचालक)

(प्रेसनोट)

# पहिल्या जागतिक कृषी पर्यटन दिनानिमित्त 'ॲग्री टूरिझम'चे जागतिक पुरस्कार जाहीर

पुणे (दि.) : पर्यटनासारख्या वेगाने वाढणाऱ्या आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या क्षेत्रामध्ये आता काळाप्रमाणे बरेच बदल घडून येत आहेत. विविध विषयांवर आधारीत पर्यटनाची दालने खुली होत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतासारख्या विपुल कृषी संपदा लाभलेल्या देशामध्ये 'कृषी पर्यटनाला' बरेच महत्व येत आहे. विशेषत: ग्रामीण विकासाला चालना देऊन गावातच शेतकऱ्यांना रोजगाराच्या संधी देणारा हा व्यवसाय शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकतो, हे बारामतीच्या 'ॲग्री टूरिझम' संस्थेने सिद्ध केले आहे.

अशा या कृषी पर्यटनाला आता जागतिक स्वरूप देण्याच्या दृष्टीने कृषी पर्यटन विकास संस्थेने यावर्षीपासून विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्या अंतर्गत संस्थेने आपला वर्धापन दिन यावर्षीपासून 'जागतिक कृषी पर्यटन दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यानिमित्ताने कृषी पर्यटन क्षेत्रात सर्वस्व झोकून देऊन कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना व संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी यंदापासून जागतिक 'कृषी पर्यटन गौरव पुरस्कार' देण्याचे घोषित केले आहे. जगभरातून विशेषत: महाराष्ट्राच्या सर्व भागांचे प्रतिनिधीत्व करणारे आणि त्या माध्यमातून कृषी रोजगारामध्ये भरीव योगदान देणाऱ्यांची विशेष परिक्षण समितीतर्फे निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये श्री. पांडुरंग तावरे (अध्यक्ष), डॉ. पृथ्वीराज पाटील (सल्लागार - एमटीडीसी), डॉ. बी. डी. पवार (संचालक - 'सिटा') यांचा समावेश आहे. मानपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून पुरस्कार वितरण येत्या १६ मे २००८ रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात होणार आहे. पुरस्कारार्थींमध्ये पुढील मंडळींचा समावेश आहे. १) दै. ॲग्रो वन, पुणे २) सह्याद्री दूरदर्शन वाहिनी ३) श्री आनंद कट्टी (टी.टी.जी. एशिया ट्रॅव्हल्स, मासिक, सिंगापूर) ४) श्री. श्रीधर हंपीहोली (कर्नाटक) ५) डॉ. अनिल देशमुख (अहमदनगर) ६) श्री. चंद्रशेखर भडसावळे (रायगड) ७) श्री. शेखर कर्पे (रायगड) ८) पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ९) सौ. अमृता पाडगावकर (सिंधुदूर्ग) १०) डॉ. सौ. रेखा महाजन (जळगाव) ११) सौ. विजया मंडलेकर (नागपूर)१२) श्री. रमेश संगपाळ (रांजणगाव)१३) श्री. माधव सहकारी (गोवा)१४) सौ. जेन एकर्ट (अमेरिका) १५) ग्रामपंचायत (काटेवाडी-बारामती) आणि उत्तेजनार्थ सन्मानार्थींमध्ये श्री. अविनाश फरांदे (सातारा), श्री. जयदीप पार्थे (सातारा), श्री. राजशेखर पाटील (नंदुरबार), प्रभाकर सावे (रायगड), आशिष अमृते (रत्नागिरी) आणि 'संस्कृती' (नाशिक) यांचा समावेश आहे.

तसेच याबरोबर दिवसभराचा विशेष सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात मान्यवर तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्रे, शंकासमाधान वगैरे कार्यक्रम होणार आहेत. सोहळ्याचे उद्‌घाटन सकाळच्या सत्रात राज्याचे पर्यटन मंत्री ना. विजयसिंह मोहिते पाटील व कृषीमंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत होणार आहे. पुरस्कार वितरण व सांगता समारोह जलसंपदा मंत्री ना. अजितदादा पवार व पुण्याच्या महापौर सौ. राजलक्ष्मी भोसले यांच्या उपस्थितीत होणार आहे.

कृषी पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने, विविध रोजगार संधीची माहिती आणि जोडीला दुपारी अस्सल महाराष्ट्रीयन पिठलं-भाकरीच्या जेवणाचा बेत आणि हे सगळं विनामूल्य होणार आहे. या कार्यक्रमासाठी गावोगावच्या शेतकऱ्यांनी, कृषी संस्थांनी, कृषी पदवीधरांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन ॲग्री टूरिझमचे संचालक पांडुरंग तावरे यांनी केले आहे. (अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०- २५५३५५९९)

***

(संस्थेविषयी माहिती)

# स्वयंरोजगारातून ग्रामविकास साधणारा ॲग्री-टूरिझमचा 'नॉस्टॅल्जिक' प्रकल्प

पुणे (दि.) : ''जोपर्यंत आपली खेडी स्वयंपूर्ण होत नाहीत, तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशाचा विकास झाला, असे म्हणता येणार नाही. ग्रामविकास साधायचा तर खेड्याकडे जाण्याची आवश्यकता आहे.'' राष्ट्रपिता महात्मा गांधींनी ६५ वर्षांपूर्वी मांडलेला हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी 'ॲग्री टूरिझम'ने एक अभिनव प्रकल्प हाती घेतला आहे. मुळामध्ये स्वयंरोजगारातून ग्रामविकास साधण्याच्या उद्देशातूनच या संस्थेची स्थापना झाली आहे.

## निरपेक्ष उद्देश

ग्रामीण भागामध्ये सध्या काही बाबतीत प्रतिकूल वातावरण असल्याने विकासाचा वेग अपेक्षेप्रमाणे वाढत नाही. मात्र तरीही कित्येक ठिकाणी निसर्गाने मुक्तहस्ताने केलेली उधळण दिसते. नैसर्गिक वनसंपदा, डोंगर-दऱ्या, नदी-कालव्यांच्या माध्यमातून सौंदर्यसृष्टी सजली आहे. त्याच्याच जोडीला या सगळ्याचा अभ्यासपूर्वक नियोजनातून उपयोग करून घेऊन रोजगार निर्मिती करता येते. शेतकऱ्यांच्या पारंपारिक शेती व्यवसायाला पूरक व्यवसायाची जोड देऊन रोजगाराची व्याप्ती वाढवता येते. हे ओळखून ॲग्री टूरिझमने विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

## 'नॉस्टॅल्जिक' मूड

शहरी भागात वास्तव्य करणाऱ्यांपैकी अनेकांनी आपल्या लहानपणी खेड्यातल्या जगण्याची मजा अनुभवलेली असते. माठातले ताक, झाडाखालचे वनभोजन, बैलगाडीतली सवारी, संध्याकाळच्या गारव्यातली हुर्डापार्टीची लज्जत चाखलेली असते. मात्र नंतर व्यवसाय-नोकरीच्या धकाधकीत त्याचा आनंद घ्यायला वेळ नसतो आणि असलाच तर सक्षम पर्याय मिळत नाही. एकीकडे असे चित्र आहे तर दुसरीकडे ज्यांना या विश्वाची ओळख केवळ पुस्तकातूनच झाली आहे, 'दूध कोण देतो तर भैय्या किंवा गवळी' असे म्हणणारी पिढी या निर्भेळ आनंदाला पारखी होत आहे.

मात्र या सर्वांना तो आनंद जर सहजगत्या मिळाला तर हवाच आहे. नेमका तोच देण्याचा प्रयत्न ॲग्री टूरिझम करीत आहे. शहरी जीवनशैलीचा 'नॉस्टॅल्जिक' मूड बरोब्बर ओळखून तो प्रत्यक्षात आणत आहे. बारामतीच्या परिसरात व भोवतालच्या वाडी-वस्त्यांमधून अत्यंत आकर्षक अशी पर्यटन स्थळे विकसीत करण्यात आली आहेत. ग्रामीण जीवनशैली आणि शहरी आधुनिक युगाची गरज याचा सुरेख समन्वय साधण्यात आला आहे. थोडक्यात काय तर, प्रवासाचा कणभरही शीण न येता निखळ पर्यटनाचा आनंद पर्यटकांना देण्याचे काम केले जात आहे.

## प्रभावी रोजगार निर्मिती

उत्पादक आणि ग्राहक यांची थेट भेट घडवून आणून ॲग्री टूरिझमने रोजगार निर्मितीचे एक नवे दालनच शेतकऱ्यांसाठी खुले केले आहे. कोणत्याही मध्यस्थाशिवाय 'रानमेव्याची' विक्री होत असल्याने तो स्वस्त तर आहेच शिवाय पौष्टिकही आहे. रानातला ऊस तिथेच बसून खाण्यातली गंमत किंवा झाडावरची बोरे अगदी ताजी ताजी तिथेच खाण्याची खुमारी काही वेगळीच असते. शिक्षणावस्थेतील पिढीसाठी कुक्कुटपालन, इमू पालन, गोपालन, मध संकलन, रेशीम उत्पादन वगैरे कुतुहलाचे प्रात्यक्षिक पाहण्याची संधी यात आहे.

ग्राहकांची आवड आणि शेतकऱ्याची निकड दोन्ही भागल्याने रोजगाराला वेगाने चालना मिळते आहे. बचतगटाच्या महिलांनी बनविलेली लोणची-पापडासारखी उत्पादने हातोहात संपत आहेत. या उत्पादनांची विविधांगी संख्याही वाढते आहे आणि अनोखी चव चाखल्याने ग्राहकांची मागणीही वाढते आहे. पुण्यात नुकत्याच भरलेल्या 'भीमथडी जत्रेत' शेवटच्या दिवशी सर्व स्टॉलवरचे सर्व पदार्थ सकाळीच संपले होते. हे त्याचेच बोलके उदाहरण आहे.

ग्रामविकासासाठी शासन तर प्रयत्नशील आहेच. पण केवळ त्यांच्यावरच विसंबून न राहता ज्याला जसे जमेल तसे त्याने हे शिवधनुष्य पेलण्याची तयारी दाखवली पाहिजे. त्याचे पहिले पाऊल ॲग्री टूरिझमने टाकले आहे, हे निश्चित..!!

***